आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,
बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे
मराठी विभाग
वार्षिक कामकाज अहवाल २०२२–२०२३

महाविद्यालयातील मराठी विभाग ऑगस्ट १९९३ मध्ये सुरू झालेला आहे.विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर असे दोन विभाग कार्यरत आहे.त्यांची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | द्वितीय वर्षकला | ०७ | १८ | २५ |
| २. | तृतीय वर्षकला | ०८ | ०१ | ०९ |
| ३. | एम.ए.भाग १ | ०२ | ०१ | ०३ |
| ४. | एम.ए.भाग २ | ०२ | ०५ | ०७ |
| | | | एकुण | ४४ |

मराठी विभागाने राबविलेले उपक्रम खालीलप्रमाणे

१) विद्यार्थी सभा

मराठी विभागातील विद्यार्थ्यांची सभा दि. ०१/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर प्रभारी प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी मार्गदर्शन केले.विभागातील सहा.प्राध्यापक डॉ.पुरुषोत्तम काळे, पोपट माने इ. उपस्थित होते.

२) वाचन प्रेरणा दिन निमित्ताने दि.१५ ऑक्टोंबर २०२२ रोजी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

३) लेखक आपल्या भेटीला

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने दि. ०९जानेवारी २०२३ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत डॉ.जागृती बधान,नाशिक यांचे कंन्टेंट रायटिंग या विषयावर ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले.

४) ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सोमवार दि. २८फेब्रुवारी २०२३ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत प्रा.डॉ.पुरुषोत्तम काळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.१०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

५) मराठी विभागाच्या वतीने दि.२३ एप्रिल २०२३ रोजी जागतिक वाचन दिन निमित्ताने ग्रंथ वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

६) सेट नेट परीक्षेत यश

यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य आणि राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत मराठी विभागामध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले खालील विद्यार्थी सेट, नेट परीक्षेत यश प्राप्त केले आहे. संस्था, महाविद्यालय, मराठी विभाग व शिक्षकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.भवारी चंद्रकांत बाळू | नेट जुन २०२२ |
| २ | प्रा.गभाले तुषार लंकानाथ | नेट JRF,जुन २०२२ |
| ३ | प्रा.भवारी चंद्रकांत बाळू | नेट डिसेंबर २०२२ |

विभागाचे कामकाज करताना संस्थाचालक,सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक, विभागाचे विद्यार्थी इ.सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे विभाग लौकिकास पात्र ठरला आहे.

मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता.आंबेगाव जि.पुणे.

बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव कोड नं. १९६

प्रभारी प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे